


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६५२. वा | सोमवार | दि. १५ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# शेगावात गैरप्रकार करणाऱ्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल...

# महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय टेकाळे व तहसीलदार रुपेश खंडारेंवर कारवाई कधी?

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील महसूल विभागात सध्या चाललंय तरी काय, असा प्रश्न दिवसेंदिवस आणखी महत्वाचा होऊ लागला आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे गैरव्यवहार किंवा नियमबाह्य कामे केल्याबद्दल जिल्ह्यात विविध ठिकाणी मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यावर कारवाई होताना दिसून येत आहे. ताजे प्रकरण शेगाव तालुक्यातील असून, सातत्याने होणाऱ्या या घटनांमुळे महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार किती मोठा आहे, हे स्पष्टपणे दिसून येत आहे. आजवर महसूल विभागात गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे समोर आलेली असल्या कारणाने या भ्रष्टाचारावर लगाम लागणार तरी कधी, असा प्रश्न उभा होत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने महसूल विभागात बोकाळलेल्या प्रचंड अशा भ्रष्टाचाराची लक्तरं काढण्याचं काम करीत आहे, परंतु महसूल विभागातील भ्रष्टाचार कमी होण्याचे नाव घेत नाही. नुकतेच घडलेले प्रकरण हे जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील गायगाव बुद्रूक शिवारातील ३ हेक्टर २४ आर. जमिनीच्या खरेदी-विक्री संदर्भातील आहे. रोकडिया नगर निवासी राम पांडे यांनी ही जमीन सदाशिव वरघट यांच्याकडून २२ फेब्रुवारी २००५ रोजी विकत घेतली होती. त्यानंतर तक्रारदाराने विकत घेतलेल्या शेतजमिनीचा फेरफार घेण्यासाठी तत्कालीन तलाठ्यांकडे अर्ज केला होता. त्या वेळी जिगाव प्रकल्पामुळे परवानगीची आवश्यकता असल्याचे सांगून फेरफार घेतला गेला नाही. दरम्यान, प्रकल्प कार्यालयाची परवानगीची गरज नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर तक्रारदार व्यक्तीला क्र. ७८१ प्रमाणे नियमानुसार फेरफार देण्यात आला. मात्र, तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांनी हा फेरफार गैरकायदेशीररित्या असल्याचे सांगत रद्द केला. मात्र, त्याची कोणतीही पूर्वसूचना पांडे यांना देण्यात आली नाही. त्यानंतर २०११ साली त्या वेळेसचे तलाठी ठोंबरे यांच्याकडे फेरफारासाठी अर्ज देण्यात आला. दरम्यान, ठोंबरे यांनी तक्रारदारास कारवाईपासून अनभिज्ञ ठेवले आणि त्याच काळात जमीन विक्रेता सदाशिव वरघट व त्यांच्या मुलांनी तक्रारदाराला शेताचा ताबा घेण्यात अडथळे निर्माण केले. या प्रकारामुळे तक्रारदाराने वरघट यांच्याविरोधात न्यायालयात धाव घेतली, तसेच वरघट कुटुंबीयांच्या विरोधात मनाई हुकूम दिला. न्यायालयाच्या या आदेशानंतरही मंडळ अधिकारी, तलाठी व इतर आरोपींनी नमुना ९ व १२ च्या नोटिसीवर तक्रारदाराच्या खोट्या स्वाक्षऱ्या घेऊन बनावट अभिलेख अस्तित्वात आणला. नेमक्या याच गैरप्रकारामुळे तलाठी सुनील ठोंबरे, मंडळ अधिकारी के. बी. मोरे, तलाठी कैलास वरघट यांच्या यांच्यासह सदाशिवय वरघट यांच्याविरोधात शेगाव ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. खरे तर बुलढाण महसूल विभागात हा झालेला गैरप्रकार फक्त हिमनगाचे टोक आहे. यापेक्षाही प्रचंड अशाप्रकारचे गैरप्रकार, भ्रष्टाचार महसूल विभागात राजरोसपणे सुरू आहेत. हे गैरप्रकार करणारे महसूल विभागात मोकाटपणे काम करीत आहेत. हे भ्रष्टाचारी एकीकडे भ्रष्टाचार करून लोकांची लुबाडणूक करतात, दुसरीडे ज्या शासनाचा पगार घेतात, त्यालाच लाखो रुपयांचा चुना लावतात. भ्रष्टाचारातून झालेल्या करोडो रुपयांच्या कमाईतून अवैध संपत्ती / अपसंपदा जमवतात. मात्र, हे सगळे होत असतानाही त्यांच्यावर कारवाई होत नाही. यामध्ये एक नाव सातत्याने अग्रणी असते ते म्हणजे महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांचे गैरव्यवहारांवर लिखाण करायचे झाल्यास एखादे पुस्तकच लिहून तयार होईल, एव्हढे प्रचंड प्रताप टेकाळे यांनी केले आहे. टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची जंत्री दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आजवर उघड केली आहे. परंतु महसूल विभागाचे अधिकारी एव्हढे लाचार झाले आहेत की, त्यांनी टेकाळेंसमोर अक्षरशः लोटांगण घातल्याचे दिसून येत आहे. टेकाळे यांना सातत्याने भ्रष्टाचारातून वाचवण्यासाठी महसूलचे अधिकारी दिवस-रात्र कार्यरत असतात. यामध्ये आघाडीवर आहेत ते बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे. खंडारे यांनी पदोपदी टेकाळे यांच्या भ्रष्टाचारात गेल्या काही वर्षांत समर्थ साथ दिली आहे. टेकाळे यांची विभागीय चौकशी सुरू असतानाही त्यांच्या नावावर असलेल्या नियमबाह्य करोडो रुपयांची अवैध संपत्तीची दुसऱ्या लोकांना खरेदी करून देण्यात आली. या प्रकरणात रुपेश खंडारे यांनी उघडपणे टेकाळेंच्या भ्रष्टाचारात साथ दिलेली आहे. हे सर्वकाही असले तरी आपल्याला हे दिसून येते की, इतर विविध प्रकरणांमध्ये तलाठी, मंडळ अधिकारी यांच्याविरोधात कारवाई होते. गैरव्यवहार प्रकरणी राज्यात तहसीलदारांवरही कारवाई केली जाते. मात्र, महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे किंवा तहसीलदार रुपेश खंडारे यांच्यावर सर्व पुरावे देऊनही कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही. याचा अर्थ महसूल विभागातून टेकाळे-खंडारे यांच्यासारख्यांना सातत्याने वाचवण्याचा प्रयत्न केला जातो. अशाने महसूल विभागातील भ्रष्टाचार हा कधीही संपणार नाही तर तो उलट वाढतच जाणार आहे. याविरोधात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने लढा लढत राहणार असून, जोपर्यंत महसूल विभागातील संपूर्ण भ्रष्टाचार निपटून काढला जात नाही आणि टेकाळे व खंडारे यांच्यावर योग्य ती कारवाई होत नाही, तोपर्यंत हा संघर्ष सुरूच ठेवला जाणार आहे.

**आमचा हा पाठपुरावा महसूल विभागातील या भ्रष्टचाऱ्यारवर संबंधित प्रशासन कारवाई करून भ्रष्टचारातून कमावलेली करोडो रुपयांची अपसंपदा शासन तिजोरीत जमा करत नाही तो पर्यंत आमचा हा लढा असाच सुरू राहणार**




## सीबीएससीच्या शाळांना महाराष्ट्र सरकारचे अनुदान मिळणार, शालेय मंत्री दीपक केसरकर लवकरच नवं धोरण करणार जाहीर

**वृत्तसंस्था/ नागपूर**

राज्यातील अनेक सैनिक शाळांमध्ये राज्य माध्यमिक शिक्षण बोर्डाचा अभ्यासक्रम असतो. पण एनडीएच्या परीक्षांमध्ये सीबीएससीचा अभ्यासक्रम असतो. त्यामुळे आपले विद्यार्थी एनडीएच्या परीक्षांमध्ये पास होत नाहीत. त्यामुळे लवकरच नवीन धोरण जाहीर करणार आहे. ज्यामुळे सीबीएससीच्या शाळांना देखील महाराष्ट्र सरकारचे अनुदान मिळणार असल्याची माहिती शालेय मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. नागपुरातील भोसला सैन्य शाळेच्या २५ व्या वार्षिक उत्सवात शालेय मंत्री दीपक केसरकर यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. भोसला सैनिक शाळेने मुलींच्या सैनिक शाळेला परवानगी मागितली आहे. ती परवानगी एका महिन्याच्या काळात मिळेल, असं देखील दीपक केसरकरांनी म्हटलं. जगाला आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ देण्याची क्षमता भारताकडे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी इतर देशातील भाषा शिकाव्या. महाराष्ट्रातील मुलांमध्ये काहीही कमी नाही.मात्र, एक कमतरता आहे, ती म्हणजे कामाचा कमीपणा



मानण्याची वृत्ती.परदेशातील मुले कोणतेही काम करण्यासाठी कमीपणा मानत नाही, असं दीपक केसरकर यांनी म्हटलं.

# शेतकऱ्यांनी जैविक शेतीकडे वळावे- सुरेंद्र अवाना

## अभिता ॲग्रो एक्स्पो राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे थाटात उदघाटन...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

जैविक शेतीमुळे पाण्याची बचत होते. जमिनीचे स्वास्थ चांगले राहते. परिणामी अधिक उत्पन्न मिळते. जैविक उत्पादने आरोग्यास लाभदायी असतात. येणारा काळ जैविक शेतीचा असून शेतकऱ्यांनी जैविक शेतीकडे वळावे, असे आ-वाहन राजस्थानमधील प्रगतीशील शेतकरी सुरेंद्र आवाना यांनी केले. राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त १२ जानेवारी रोजी आयोजित राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाचे दुपारी १ वाजता थाटात उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी बियाणे उत्पादक सुखजितसिंग भंगू (पंजाब), बियाणे उत्पादक प्रीतम सिंग (हरियाणा), प्रसिद्ध केळी उत्प-ादक धीरेंद्रकुमार देसाई (गुजरात), नारळ व सुपारी व्यावसायिक पांडुरंग पाटील (गोवा), मृद व जलसंधारण अभियांत्रिकी शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुमार मिश्रा(नवी दिल्ली), पोल्ट्री फार्म व्यावसायिक रवींद्र मेटकर(अमरावती), अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्या संस्थापक अध्यक्षा जयश्रीताई शेळके होत्या. याव-ेळी नगराध्यक्ष सतीश तायडे, माजी नगराध्यक्ष छगन मेहेत्रे, देविदास ठाकरे, मराठा सेवा संघाचे माजी प्रदेशाध्यक्ष नेताजी गोरे, संभाजी ब्रिगेडचे माजी प्रदेशाध्यक्ष अनंत चोंदे, राजर्षी शाहू परिवाराचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब शेळके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना सुरेंद्र आवाना म्हणाले, राजस्थानमध्ये तुलनेने कमी पाऊस पडतो. शेतकऱ्यांना दुष्काळी संकटांचा सामना करावा लागतो. मात्र तरी सुद्धा एकही शेतकरी आत्महत्या करीत नाही. कारण तेथील शेतकरी शेतीपूरक व्यवसाय करतात. जोडधंदा म्हणून पशुपालन, दुग्धव्यवसाय, बियाणे उत्पादन, फळबाग लागवड करतात. विविध मार्गांनी त्यांना उत्पन्न मिळते. त्यामुळे आर्थिक समस्या राहत नाही. शेतकऱ्यांनी एकीकृत शेती आणि शेतीपूरक व्यवसाय करावा, असेही सुरेंद्र आवाना यावेळी बोलतांना म्हणाले. सिंचन संस्कृती निर्माण केल्याशिवाय आपल्या जीवनात समृद्धी येऊ शकत नाही, असे प्रतिपादन जलतज्ञ सुधाकर चौधरी यांनी केले. आपल्या उत्पादनांची मार्केटिंग आपणास करता आली पाहिजे. इतरांवर अवलंबून राहून जमणार नाही. शेतकऱ्यांनी ही कला अवगत करुन घ्यावी. मालाची विक्री करता येत असेल तरच उत्पादन घ्यावे, असा सल्ला हरियाणामधील बियाणे उत्पादक प्रीतम



सिंग यांनी दिला. पंजाबमधील बियाणे उत्पादक तथा प्रगतिशील शेतकरी सुखजितसिंग भंगू यांनी आपले अनुभव कथन केले. अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांनी राजे लखुजी जाधव यांच्या काळातील सिंचनाच्या सोयीबाबत सांगून सिंडखेड राजाची सिंचन संस्कृती अधोरेखित केली. संचलन क्षिप्रा मानकर यांनी केले. प्रास्ताविक आणि आभार मेहेत्रे सर यांनी मानले. शाहीर राजेंद्र कांबळे यांनी आपल्या पहाडी आवाजात महामानवांवरील शाहिरी सादर केली. प्रारंभी महानायिकांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. राज्य शासनाचा कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्राच्या सहकार्याने अभिता ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि. कंपनीने अभिता ॲग्रो एक्स्पो हे कृषी प्रदर्शन आयोजित केले आहे. येथील मातोश्री लॉन्सच्या बाजूला १२ ते १५ जानेवारी पर्यंत हे कृषी प्रदर्शन चालणार आहे. शेतकरी, नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमीत्य दिव्यांगाला कुबड्या वाटप...



जनसंचलन/ खामगाव

जगाला प्रेरणास्थान देणार्या राजमाता जिजाऊ व युवकांना प्रे-रणादाई असलेले महामानव स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमीत्य विराट मल्टीपर्पज फाऊन्डेशन च्या कार्यलयात दिव्यांगाला कुबड्या भेट देत साजरा करण्यात आला जयपुर ग्रामपंचायत सरपंचपती गोपाल लांडे यांच्या प्रमुख ऊपस्थितीत अध्यक्ष मनोज नगरनाईक यांच्या मार्गदर्शनाखालीअनंताभाऊ भांगे मो.रईस यांना कुबड्या देण्यात आल्या यावेळी प्रहार शहर अध्यक्ष क्षत्रुधन ईंगळे,दिव्यांग खेळाडु वैभव संभारे,गजानन कुळकर्णी,शेखर तायडे,महादेव पांडे,शेषराव तायडे,गोपाल तायडे, गोपाल लांडे, अरूण भांगे,गजान धंधरे लक्ष्मण कान्हेरकर आदील लोक यावेळी उपस्थितीत होते.

# एक दिवस महाराष्ट्र लहानेच्या कार्याची दखल घेईल

## खा.सुप्रियाताई सुळे यांनी दिली कौतुकाची थाप...

जनसंचलन/बुलढाणा

कुष्ठरोगी म्हटले की, बाबा आमटे आठवतात, कुपोषण म्हटले की, डॉक्टर कोल्हे दांपत्य आठवते तसेच विधवा विवाह म्हटला की, सद्या डोळ्यापुढे एकच नाव येते, ते बुलडाण्याच्या प्रा.डी. एस. लहाने यांचे. दोन दिवसापूर्वी खासदार सुप्रिया सुळे जिल्हा दौऱ्यावर होत्या. निमंत्रण नसताना अनपेक्षितपणे त्या विधवा विवाह स्थळी आल्या.. अन विधवा पुनरुत्थान कार्याबद्दल ऐकूण चकित झाल्या. न राहवुन त्यांनी स्वतः पुढाकार घेत प्रा.डीएस लहाने यांचा सत्कार करीत पाठीवर कौतुकाची थापही दिली. हा प्रसंग १२ जानेवारी २०२४ रोजी हजारो जिजाऊ भक्तांच्या उपस्थितीत दिसून आला, तो जिजाऊ सृष्टीवर. सिंदखेडराजा येथे १२ जानेवारी रोजी खा. सुप्रिया सुळे जिजाऊ चरणी नतमस्तक होण्यासाठी दरवर्षी प्रमाणे आल्या होत्या. त्या आल्या तेव्हा मुख्य सभा मंडपात विधवा विधुर परीतक्त्या विवाह सोहळा पार पडत होता. निमंत्रण नसले तरी चौकसपणे त्यांनी कार्यक्रमाविषयी माहिती घेत विवाह सोहळ्याला हजेरी लावली. ही बाब उपस्थितांसाठी अनपेक्षित होती. प्रा. डी. एस. लह-ाने यांनी विधवा विवाह, विधवांचे रोजगार, त्यांना सामाजिक




दर्जा देण्यासाठी चालवलेला सामाजिक सुधारणेचा प्रयत्न याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी लग्न मंडपात जोडप्यांना आशीर्वाद तर दिलेच मात्र हे कार्य महाराष्ट्राने दखल घेण्याजोगे आहे. एक दिवस लहाने यांचं कार्य राज्यस्तरावर दखलपात्र होईल असे गौरवउद्गार देखील काढले व त्यांनी त्यांचा सत्कार केला. हजारो जिजाऊ भक्तांच्या उपस्थितीत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. बुलडाण्यात पहिली विधवा परिषद पार पडल्यानंतर राज्यभर विधवांच्या सन्मानासाठी विविध कार्यक्रम घेतले जात आहे. शासन स्थरावर यावर चर्चा सुरू झाली आहे. याची सुरुवात प्राध्यापक डी. एस. लहाने यांनी बुलडाण्यात केली हे विशेष. यावेळी खा.रक्षताई खडसे, माजी आ.रेखाताई खेडेकर,डॉ. मनोहर तुपकर, शाहीनाताई पठाण, आदी उपस्थित होते.


मराठा महिला अर्बन

को-ऑपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
| --- | --- | --- | --- |
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com

तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क

सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)

मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.


*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्याहस्ते २१ कोटीच्या कामांचे भूमिपूजन व उद्घाटन...

**जनसंचलन/मेरा बु.**

विकास काय असतो हे गजानन वायाळ यांनी सातत्याने आपल्या कार्यशैलीतून दाखवून दिले आहे. मेरा बु ग्रामपंचायतीमध्ये आजपर्यंत सर्वांना विश्वासात घेऊन दोन ते अडीच वर्षाच्या काळामध्ये त्यांनी विकासकामे केली असून अनेक कामे नव्याने मंजूर केली आहे. अशा २१ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व उदघाटन सोहळा १४ जानेवारी रोजी मेरा बु. येथे माजी मंत्री तथा सि. राजा मतदार संघाचे आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्याहस्ते होणार आहे. चिखली तालुक्यातील मेरा बु. येथे २१ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व उदघाटन माजी मंत्री तथा सि. राजा मतदार संघाचे आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. तर समारंभाध्यक्ष रा. काँ. चे जिल्हाध्यक्ष नाझेर काझी, कार्यक्रमांचे मार्गदर्शक व विकास योद्धा असलेले रा.काँ. चे तालुका अध्यक्ष तथा मनूबाई ग्रामसेवा सोसायटीचे अध्यक्ष आणि ग्रा.पं. सदस्य गजानन वायाळ, मेरा बु. गावाच्या सरपंच सौ. अनिताताई लक्ष्मण वायाळ, उपसरपंच दिनकरराव डोंगरदिवे, तसेच नामवंत मंडळींची प्रमुख उपस्थीती लाभणार आहे. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रख्यात कवी व निवेदक अजीम नवाज राही हे करणार आहेत. या कार्यक्रमाच्या उदघाटन व भूमिपूजन करण्यात येणाऱ्या विविध विकास कामामध्ये मेरा बु. (फाटा वस्ती) जलजीवन मिशन अंतर्गत फाटा वस्तीसाठी स्वतंत्र पाण्याची टाकी व वितरण व्यवस्था १ कोटी ३५ लक्ष रु., जनसुविधा केंद्र बांधकाम ५० लक्ष रु., फाटा वस्तीसाठी अंतर्गत रस्ते बांधणे २० लक्ष रु., जिल्हा वार्षीक योजनामध्ये विद्युत रोहित्र नवीन पोल १० लक्ष रु., फाटा वस्ती शाळा दुरुस्ती १० लक्ष रु. २ कोटी २९ लक्ष रुपयांची विकास कामे गावामध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत विशेष दुरुस्ती १४ कोटी रु., मेरा-पिंपळगाव सोनारा रस्ता दुरुस्तीसाठी ११ दशलक्ष रु., मुलभूत सुविधा योजनाअंतर्गत रस्ते बांधकाम ७५ लक्ष रु., जन सुविधा केंद्र बांधणे ५० लक्ष रु., नविन शाळा खोल्या व शाळा दुरुस्ती ५० लक्ष रु., जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विद्युत रोहित्र व पोल बसविणे १ कोटी रु., रोजगार हमी योजने अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे ४५ लक्ष रु., जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत स्मशान भूमी संरक्षण भिंत व व्यवस्थापन करणे ३० लक्ष रु., पशुवैद्यकीय दवाखाना इमारत बांधणे ४० लक्ष रु.,



आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत रस्ते सभामंडप व नाली बांधकाम करणे ३५ लक्ष रु. बजेट २०२१/२२ अंतर्गत तलाठी भवन बांधकाम ५० लक्ष रु., अल्पसंख्याक विकास योजने अंतर्गत शादीखाना व कब्रस्तान शेड बांधणे २५ लक्ष रु., दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत रस्ते व नाली बांधकाम करणे ३५ लक्ष रु., सामाजिक न्याय विकास योजने अंतर्गत अण्णाभाऊ साठे सभागृह बांधणे १० लक्ष रु., छत्रपती शिवाजी महाराज चौक सौंदर्गीकरण करणे १० लक्ष रु., ग्रामपंचायत स्तर, जि. प. स्तर, पं.स. स्तर १५ वा वित्त आयोग १ कोटी रु., आरोग्य उपकेंद्राची दुरुस्ती करणे २५ लक्ष रु. असे एकूण २१ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व उदघाटन सोहळ्यात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन गजानन वायाळ यांनी केले आहे.

# ह्युमन राईट ॲण्ड वुमन क्राईम कंट्रोल असोसिएशन च्या जिल्हाध्यक्ष पदी धिरज अवसरमोल

## तसेच जन कल्याण समाज उन्नती पत्रकार संघटना म.रा. च्या तालुका अध्यक्ष पदी धिरज अवसरमोल...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा येथील राहिवासी धिरज अवसरमोल हे पत्रकारीतेत तथा समाज कार्यात कार्यरत असुन न्युज महाराष्ट्र न्युज चॅनेल चे मुख्यसंपादक म्हणून कार्य करीत आहे. गेली अनेक वर्षापासुन पत्रकारीतेच्या अनुभवातुन त्यांनी अनेक सामाजिक तथा गरिब गरजु, अनाथ, अत्याचारित लोकांना न्याय देण्यात काम केलेले आहे. त्याच कामाचा आढावा घेऊन प्रारंभिक इंटरनॅशनल शुमन राईट ऑफ वुमन क्राईम कंट्रोल असोसिएशनचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष मा. दिलीपजी मोहिते तथा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मा. शशीकांत दुसाने सर यांच्या शिफारस तथा आदेशाने बुलडाणा जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती देण्यात आली. व जन कल्याण समाज उन्नती पत्रकार संघटना म.रा. च्या बुलडाणा तालुका अध्यक्ष पदी. तथा ह्युमन राईट द्वारा ज्यामध्ये अगदी व्यक्तीचा जातीचा विचार न करता धर्म राष्ट्रीय मानवधिकार आणि महिला गुन्हेगारी नियंत्रण आणि मानवी हक्कांच्या सार्वभौमिक घोषणा पत्रात समाविष्ट केलेले मुलभुत १८०१ स्वातंत्र आणि महिला गुन्हेगारी नियंत्रण इतर भारतीय मानवांना आनंदीत करते, यामध्ये ध्येय आणि स्वप्न म्हणजे मानवी हक्क आणि महिला गुन्हेगारी नियंत्रणाचा प्रचार आणि संरक्षण करण्याचे स्वप्ने सत्यतात उतरविण्याचे काम करते. राष्ट्रीय आणि सरकारी, ग्रासरुट ज्ञान ही शक्ती आहे. म्हणुन मानवधिकार शिक्षणाद्वारे लोकांचे सक्षमीकरण गैरवर्तन रोखण्यासाठी ह्युमन राईट काम करीत असते. यामध्ये शारिरीक व मानसिक अखंडता धर्म, श्रध्दा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संपूर्ण मानवतेसाठी भेदभाव पासुन स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अधिकारांचे गंभीर गैरवापर संपवण्यासाठी काम करते. तसेच जिल्ह्यातील पत्रकारांच्या अनेक समस्यांना ज्ञान देण्यासाठी जिल्ह्यातील पत्रकारांना संघटित करुन समाजातील अन्यायग्रस्त गरिब गरजु पिढीतांना न्याय मिळवुन देण्याचे काम ही संघटना करते. संस्थापक अध्यक्ष मा. विनोदजी पवार, जनकल्याण समाज उन्नती पत्रकार संघटना यांच्या आदेशान्वये बुलडाणा जिल्हाध्यक्ष मा. विजय जयस्वाल यांच्या स्वाक्षरीने धिरज अवसरमोल यांची बुलडाणा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

# तथागत ग्रुपच्या वतिने आमरण उपोषणाची सांगता विविध मागणी मान्य...

**जनसंचलन/मेहकर**

येथील तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतीने विविध मागण्यांसाठी तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदीप गवई यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक तहसील कार्यालयसमोर खालील मागण्यासाठी बेमुदत उपोषण करण्यात आले महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर अनेकांनी अतिक्रमण केले असून आदेशानंतर ही अधिकाऱ्यांनी ते हटविले नाही. त्या अधिकारी व एमआयडीसी भुखंड हडप करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. शहरातील बोगस मिटाई दुकानदारांवरती तत्काळ कार्यवाही करावी, अन्न व औषध प्रशासनाच्या मदतीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात यावे. नगरपरिषद समोरील अतिक्रमण हटवुन झाडे लावण्याचे काम सुरू करावे. येथील पोलिस वसाहतीचे बांधकाम तत्काळ सुरू करण्यात यावे. तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची जे जे एन्ड सन्स व नापतोल या दोन कंपन्यांकडून विटंबना केली असता, दोन्ही कंपन्या तात्काळ बंद करण्यात याव्यात.आदी मागण्यांसाठी तहसील कार्यालयासमोर संदीप गवई, सुनिल वनारे,दुर्गादास आंभोरे, राधेशाम खरात, महादेव मोरे, आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपोषणास बसले असता यावेळी प्रशासनाने सर्व मागण्या मंजुर केल्या व भाई कैलास सुखधाने यांच्या व सर्व प्रशासन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपोषन कर्ते यांचे उपोषण सोडविण्यात आले. यावेळी, तथागत ग्रुपचे मार्गदर्शक भाई कैलास सुखधाने, संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई, ॲड.देवकांत मेश्राम,सुनिल वनारे, दुर्गादास आंभोरे, महादेव मोरे, राधेशाम खरात,गौतम नरवाडे, कुणाल माने, अख्तर कुरेशी, संतोष खरात,अंकुश हिवाळे, अनिल धांडे,श्रीकृष्ण शेटाणे,सचिन गवई,संदिप राऊत,राहुल मोरे,देवानंद अवसरमोल,अकुंश राठोड, गजानन सरकटे,विजय सरकटे, नितीन गवई,रवि मगर,शुभम नरवाडे, नितीन बोरकर, राजु दादा गवई लक्ष्मीताई कस्तुरे, राधाताई यंगड,प्रियंका मगर आदि शासकिय सबंधित प्रशासन व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुपर आरएसएस बना जिजाऊसृष्टीवरुन पुरुषोत्तम खेडेकर यांचे मराठा समाजाला आवाहन...

**जनसंचलन/ बुलढाणा**

आजवर जे घडले ते होऊन गेले. जुने उगाळत बसण्यापेक्षा नव्याने चिंतन करण्याची गरज आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला नावे ठेवण्यापेक्षा सुपर आरएसएस बना. पुनरुज्जीवित होऊन कामे करा, असे आवाहन मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांनी केले. राजमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त शुक्रवारी सिंदखेडराजात जिजाऊसृष्टी परिसरात आयोजित विशेष कार्यक्रमातील शिवधर्म पीठावरून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार संजय गायकवाड, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष कामाजी पवार, चंद्रशेखर शिखरे, शिवमती खेडेकर, गंगाधर बनबरे, अर्जुन तनपुरे, नवनाथ घाडगे, सीमा डोके, विजयकुमार घोगरे, ॲड. मनोज आखरे, मांगीराम चोपडे यांच्यासह विविध पक्षांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. खेडेकर म्हणाले, सिंदखेडराजा विकास आराखड्यासाठी ४५४ कोटी रुपयांना तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. जिजाऊसृष्टीसाठी ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातील विकासकामे प्रत्यक्षात यायला हवी.



लखुजीराजांच्या समाधीची देखभाल व्हावी, एमएसआरडीसीच्या जागेवर शहाजीराजांचे स्मारक व्हावे, अशी अपेक्षा खेडेकर यांनी व्यक्त केली. निवडणुकीत संभाजी ब्रिगेडच्या पाठीशी उभे राहा, असे आवाहन केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विद्यमान पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांसह साऱ्यांचेच छत्रपती शिवाजी महाराज महादैवत आहेत. प्रेरणास्रोत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रात होते. १२ जानेवारीला विवेकानंद जयंती साजरी करण्यासोबत जिजाऊ जन्मोत्सवात सहभागी झाले असते तर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांच्या मनात वेगळा आदर असल्याचे दिसले असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वच ठिकाणी तिथीचा जप करते. श्रीराम मंदिराचे उद्घाटन मात्र पौष महिन्यात होत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. मागच्या वर्षी पोलिसांनी जिजाऊभक्तांच्या गाड्या अडविल्या असतानाही एकमेकांच्या मांडीला मांडी लावून, अगदी गर्दीत जिजाऊभक्त या ठिकाणी बसले होते. आज आपण खुर्च्यांची व्यवस्था केली, तरीही त्या रिकाम्या असल्याचा उल्लेख करीत आपल्यावर चिंतनाची वेळ आली असल्याचे खेडेकरांनी नमूद केले.मराठा सेवा संघाच्यावतीने उद्योग क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रमोद मानमोडे यांचा मराठा विश्वभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रात कार्य करणाऱ्या श्यामजी शिंदे यांना मराठा क्रीडाभूषण तर शिवश्री राजेंद्र कोल्हे यांना मराठा कलारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बारामतीत अजितदादांची तोफ कडाडली शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचा घेतला समाचार...

**वृत्तसंस्था/बारामती**

मी राजकीय कारकिर्दीत अनेकांना पदे दिली. मानसन्मान मिळवून दिला, पण त्यातीलच काही मंडळी कुठे अध्यक्ष होताहेत, गावोगावी घोंगडी बैठका घेत आहेत. शहर, तालुक्याचा विकास कोणी केला हे त्यांनी त्यांच्या मनालाच विचारावे. मी जरा कोणाला काही बोललो की फोन करून बघा कसा बोलतोय असे सांगत आहेत. अशी लोक ओवाळून टाकली पाहिजेत, या शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचा समाचार घेतला. बारामतीत आयोजित एका कार्यक्रमात त्यांनी यावर भाष्य केले.

पवार म्हणाले, एका जमिनीच्या विषयासंबंधी माझी आई कोर्टात गेली होती. तिने तेथील अस्वच्छता पाहिली. त्यानंतर मला सांगितले की, तू बारामतीचा आमदार आहे. स्वच्छतेबाबत तुझे कौतुक होते. पण जरा कोर्टात जाऊन अवस्था पहा, त्यावर मी त्रयस्थ व्यक्तीला तेथे जाऊन पाहणी करायला सांगितले. मी मागे कोर्टात गेलो होतो. पण तेथील न्याय व्यवस्थेला ते आवडले नव्हते. त्यांनी नाराजी व्यक्त केल्याने मी यावेळी त्यांच्या क्षेत्रातील एका मान्यवराला सांगून तेथील कामे पूर्णत्वाला नेतो असा शब्द दिला. मी तेथे राज्य शासनाच्या माध्यमातून रंगरंगोटी, लॅण्डस्केपिंग करून देतो. बारामतीच्या नागरिकांना कोर्टात गेल्यावर जर स्वच्छ वाटत नसेल तर तो आमचा आणि बारामतीकरांचा कमीपणा आहे.शरद पवार गटाचे तालुका आणि शहराध्यक्ष वकील आहेत. याचा संदर्भ घेत उपमुख्यमंत्री पवार पुढे म्हणाले, आपले वकील बाकीच्या ठिकाणीच फार लक्ष देतात. कुठे अध्यक्ष होतात, काय होतात. त्यांनी मनाला विचारावे की बारामती शहर, तालुक्याचा विकास कोणी केला. यातील अनेकांना मी मोठे केले, त्यांना पदे दिली, मानसन्मान दिला. हे लोक कोणाला माहित पण नव्हते. त्यातील अनेकांनी माझ्या




तरुणपणात माझ्यासोबत काम केले आहे. पण आता ते गावोगावी घोंगडी बैठका घेत आहेत. मी कोणाला काय बोललो की बघा कसा बोलतो असे म्हणत आहेत, असे लोक ओवाळून टाकले पाहिजेत.

# करोडो रामभक्तांचे स्वप्न साकार होत आहे - लालकृष्ण आडवाणी

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

२२ जानेवारीला अयोध्येतील नवनिर्मित मंदिरात राम लल्लाचा अभिषेक होणार आहे. हा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. हा दिवस पाहण्यासाठी हजारो राम भक्तांनी बलिदान दिले होते. हजारो लोकांनी आपली घरे सोडली. लाठीचार्ज केला, कोर्टात केस लढवली. मग हा दिवस आला. १९८० नंतर राममंदिर आंदोलन थोडे दबले होते, पण त्यानंतर १९९० मध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते लालकृष्ण अडवाणी यांनी वेगळीच ज्योत पेटवली. त्यासाठी ते गुजरातमधील सोमनाथ येथून प्रवासाला निघाले. या प्रवासाला ३३ वर्षे पूर्ण झाली आ-हेत. प्राण प्रतिष्ठाही दूर नाही. यापूर्वी लालकृष्ण अडवाणी यांनी राष्ट्रधर्म या मासिकाशी संवाद साधला होता. यामध्ये त्यांनी श्री रामलल्ला यांचा अभिषेक पाहण्यासाठी उत्सुक असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, हा क्षण आणल्याबद्दल, रामललाचे भव्य मंदिर उभारल्याबद्दल आणि त्यांचा संकल्प पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी अभिनंदनास पात्र आहेत. या प्रवासाचे चळवळीत रूपांतर होईल हे मला माहीत नव्हते आपल्या रथयात्रेतील अविस्मरणीय क्षणाची आठवण करून देताना लालकृष्ण अडवाणी म्हणतात की, आज रथयात्रेला ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. २५ सप्टेंबर १९९० रोजी सकाळी जेव्हा आम्ही रथयात्रेला सुरुवात केली तेव्हा आम्हाला माहित नव्हते की ज्या भगवान रामावरील श्रद्धेने आम्ही ही यात्रा सुरू करत आ-होत ती देशात चळवळीचे रूप घेईल. त्यावेळी देशाचे विद्यमान पंतप्रधान




नरेंद्र मोदी त्यांचे सहाय्यक होते. संपूर्ण रथयात्रेत ते त्यांच्यासोबत राहिले. तेव्हा तो फारसा प्रसिद्ध नव्हता. पण त्याच वेळी रामाने आपल्या मंदिराचा जीर्णो द्धार करण्यासाठी आपला एकमेव भक्त निवडला होता. अडवाणी जी स्वत: मान-तात की अयोध्या आंदोलन ही त्यांच्या राजकीय प्रवासातील सर्वात निर्णायक परिवर्तन घडवून आणणारी घटना होती, ज्यामुळे त्यांना भारताचा पुन्हा शोध घेण्याची आणि या प्रक्रियेत स्वत:ला पुन्हा समजून घेण्याची संधी मिळाली.

## पशुपक्षी प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद विविध प्रजातींचे प्राणी बघण्यासाठी नागरिकांसह विद्यार्थ्यांची गर्दी

**जनसंचलन/सिंदखेड राजा**

पशुपक्षी प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद विविध प्रजातींचे प्राणी बघण्यासाठी नागरिकांसह विद्यार्थ्यांची गर्दी सिंदखेड राजा : (एशिया मंच वृत्त)

अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनातील १४ जानेवारी २०२४ रोजीच्या पशुपक्षी प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकरी, नागरिकांसह विद्यार्थ्यांनी विविध प्रजा-तींचे प्राणी बघण्यासाठी गर्दी केली होती. येथील मातोश्री लॉन्सच्या बाजूला १२ जानेवारीपासून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. कृषी प्रदर्शनाचा तिसरा दिवस पशुपक्षी प्रदर्शनाचा होता. राज्यभरातील पशुपालकांनी आपले पशुपक्षी प्रदर्शनाकरिता आणले होते. गाय, म्हैस, शेळी, रेडा, कुत्रा, कोंबड्या यासह इतर पशुपक्षी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. अनेक शाळांतील विद्यार्थी पशुपक्षी प्रदर्शन पाहण्यासाठी आले होते. आपल्याकडील शेती बेभरवशाची आहे. निर्सगाची अवकृपा आणि शेतकरी अनास्था यामुळे शासना-चे दुर्लक्ष यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. निव्वळ शेती केल्यापेक्षा शेतीला जोडधंद्याची जोड दिली पाहिजे. पशुपालनाचा व्यवसाय करुन शेतकऱ्यांनी उन्नती साधा-वी. यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने पशुपक्षी प्रदर्शन आयोजित केल्याची माहिती दिशा बचतगट फेडरेशनच्या संस्थापक अध्यक्ष जयश्रीताई शेळके यांनी यावेळी दिली.




## अमडापूर येथे (उबाठा) शिवसैनिकांनी नार्वेकरांच्या निकाला विरुद्ध नोंदविला निषेध



**जनसंचलन/ चिखली**

गुरुवार रोजी सकाळी १० वा.अमडापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यांसमोर (ऊबाठा) शिवसैनिकांना एकत्रित येऊन शिव-सेना मूळ राजकीय पक्ष एकनाथ शिंदेचां या नार्वेकरांनी दिलेल्या निकाला विरुद्ध आक्रमक पवित्रा घेत,घोषणाबाजी देत निषेध नोंदविला. आमची उद्धव बाळासा-हेब ठाकरे यांच्यावर श्रद्धा असून, निषेध नोंदविण्यापूर्वी कार्यकर्त्यांनी नरेंद्र खेडेकर यांना दूरध्वनीवरून चर्चा केली असता, खेडेकर यांनी कार्यकर्त्यांना सबुरीचा सल्ला दिला. येत्या काळात संक्रांत ही कोणत्या पक्षावर येणार जनता त्यांना चांगलाच धडा शिकवेल तसेच तुम्ही कार्यकर्त्यांनी गर्भगळीत न होता तितक्यात जोमाने तयारी ठेवा असा संदेश नरेंद्रजी खेडेकर यांनी दिला असून, जनता ही सदैव आपल्या पाठीशी आहे असा संदेश त्यांनी दूरध्वनीवरून कार्यकर्त्यांना दिला. यावेळी प्रलय खरात, अण्णा देवकर, भीमराव देशमुख, बंडू सरसे, किशोर डहाळे, अनिल देशमुख, बंटी देशमुख, कोंडूबा केवट, सुनील भालेराव, घनश्याम जयस्वाल, अक्षय माळ-ोदे, अनिल राऊत, संजय गायकवाड, शिवाजी गायकवाड, अनिल, समाधान जोहरे, योगेश सपकाळ असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958